| | |
|---|---|
| MHPU180006052023 | काळुराम दत्तु पुणेकर व इतर<br>विरूध्द<br>बाळासो हरिदास कामठे व इतर |

**निशाणी क्र.७० खाली आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ नुसार प्रतिदाव्यातील मयत प्रतिवादी क्र.२ कैलास आप्पा वाळुंजकर यांचा दि.२६.०७.२०२५ मृत्यु झाला असल्यामुळे त्यांचे वारस प्रतिवादी क्र.**२अ** श्री. बायसाबाई कैलास वाळुंजकर, वय– ५५, धंदा– घरकाम, प्रतिवादी क्र.**२क**. महेश कैलास वाळुंजकर, वय–२० वर्षे, धंदा–शेती, दोघे रा. लोणारवाडी, ता. दौंड, जि.पुणे यांना दाव्यात समाविष्ट करुन घेण्याची मागणी केली. तसेच सदर प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभीलेखावर घेतल्यास प्रतिवादींच्या बचावास कोणतीही बाधा निर्माण होत नसुन उलट न्यायदानास मदत होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२. सदर अर्जावर प्रतिदाव्यातील प्रतिवादीचे म्हणणे मागविण्यात आले असता त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांनी योग्य तो आदेश करण्याची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचे म्हणणे ऐकले व कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा प्रतिदावा साठेखत रद्द करून व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. सदर प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.२ कैलास वाळुंजकर हे मयत झाल्याबाबत स्वतः मुळ दाव्यातील वादीने नि.क्र.६५ दि.३०.०९.२०२५ वरील पुरशिसद्वारे कळविले. त्यामुळे, सदर प्रकरणात कैलास वाळूंजकर मयत झाल्याची बाब दोन्ही पक्षांना मान्य आहे. त्यांचे वारसांचा सदर प्रकरणातील अचल संपत्तीमध्ये हिस्सा असल्याने त्यांचे हक्क व अधिकारावर सदर दाव्याच्या न्यायनिर्णयाचा परिणाम होणार आहे. सदर प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादी क्र.२ चे वारसांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. प्रकरणातील प्रतिदाव्याचे स्वरुप हे अचल संपत्तीच्या संबंधाने असुन प्रकरणातील होणा–या अंतिम न्यायनिर्णयामुळे सदर अर्जातील मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारसांचे हक्क व अधिकारावर परिणाम होणार आहे. करीता, मी खालील

आदेश परीत करतो –

**:: आदेश ::**

१. निशाणी ७० वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला आदेशित करण्यात येते की, अर्जातील नमुद प्रतिदाव्यातील मयत प्रतिवादी क्र.२ कैलास आप्पा वाळुंजकर यांचे वारस प्रतिवादी क्र.**२अ** श्री. बायसाबाई कैलास वाळुंजकर, वय–५५, धंदा– घरकाम, प्रतिवादी क्र.**२क**. महेश कैलास वाळुंजकर, वय–२० वर्षे, धंदा–शेती, दोघे रा. लोणारवाडी, ता. दौंड, जि.पुणे यांना पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर घ्यावे.

३. वादीने येणेप्रमाणे दाव्यात पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत प्रकरणात दाखल करावी.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.23 17:37:20 +0530

ठिकाणः दौंड,
दिनांक २३/०७/२०२६

**(एस.एन. पाटील)**
२रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, जि. पुणे